CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.


u RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com    lakshamaha.dhule@gmail.com    lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३२९ वा | रविवार दि. २४ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

### भूखंड-उद्याने दत्तक देण्याचे धोरण रद्द करावे : पाटील

**मुंबई ।** मुंबई महापालिका प्रशासन पुन्हा एकदा शहरातील मनोरंजन मैदाने आणि क्रिडांगणे दत्तक तत्वावर देण्याबाबत धोरण



आणत आहेत. महापालिकेने हे धोरण रद्द करण्यात यावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जयंत पाटील यांनी केली आहे. जयंत पाटील यांनी पालिका आयुक्तांना पत्र लिहून ही मागणी केली आहे. जयंत पाटील यांनी पत्रात म्हटलं आहे की, मैदाने व क्रीडांगणे यांची देखभाल पालिकेला परवडत नसल्यामुळे या मोकळ्या जागा दत्तक तत्वावर देण्याचा विचार पालिका करत आहे.

## न्यूज कॉलम

### मजुराचा मृत्यू; खुनाचा गुन्हा दाखल

**धुळे ।** शेतात जाण्यास नकार दिला म्हणून दांडक्याने मारहाण केल्यामुळे गंभीर जखमी मजुराचा मृत्यू झाला. सुका मालसिंग पावरा (वय ४५, रा. कोडीद, पिंपरीपाडा, ता. शिरपूर) असे मजुराचे नाव आहे. त्याच्या मृत्यूप्रकरणी संशयित वसंत विश्वास पाटील (नेरपगार) याच्याविरुद्ध शिंदखेडा पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला. डोंगरगाव (ता. शिंदखेडा) येथे ही घटना घडली. या प्रकरणी मृत सुका पावरा यांची पत्नी मुन्नीबाई पावरा यांनी फिर्याद दिली. पती सुका पावरा यांना वसंत पाटील याने जबरदस्ती शेतात नेण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी त्यांनी नकार दिल्याने पाटीलने बेदम मारहाण केली.

### तरुणास मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** एकाच्या बहिणीचे छायाचित्र मोबाईलच्या डीपीवर ठेवल्याच्या कारणावरून तरुणास फायटरसह हाताबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याप्रकरणी संशयित चौघांवर निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. याबाबत उभंड (ता. साक्री) येथील लक्ष्मण जयसिंग भवरे याने दिलेल्या तक्रारीनुसार त्याने गावातील एकाच्या बहिणीचे छायाचित्र मोबाईलच्या डीपीवर ठेवले.

# अपात्रता सुनावणीच्या तोंडावर ‘सागर’ बंगल्यावर खलबते

### राजकारणात पुन्हा बॉम्बस्फोट होणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लालबागच्या राजाच्या दर्शनानिमित्ताने मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी दुपारी सपत्नीक लालबागच्या राजाचे दर्शन घेतले. त्यानंतर ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्याकडे रवाना झाले. तिथे त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व फडणवीसांशी संवाद साधला. शिवसेना आमदारांची अपात्रतेची सुनावणी, संभाव्य मंत्रिमंडळ विस्तार अन् अजित पवारांचा सरकारमधील प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर या तिन्ही नेत्यांत खलबते झाल्यामुळे राज्याच्या राजकारणात बॉम्बस्फोट होणार का? अशी चर्चा रंगली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात आगामी लोकसभा निवडणुकीच्या मुद्यावरही चर्चा झाली. त्यात शहा यांनी या दोन्ही नेत्यांना महाराष्ट्रातील लोकसभेच्या सर्व ४८ जागांवर लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना दिल्या. राज्य मंत्रिमंडळाच्या संभाव्य विस्तारावर देखील या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार हे बैठकीला उपस्थित नसल्याने चर्चांना उधान आले आहे. रोहित पवार यांनी केलेल्या टीकेनंतर अजित पवार या बैठकीला नसल्याने खरेच भाजपसोबत गेल्यानंतर अजित पवारांचे खच्चीकरण सुरू आहे का असा सवाल राजकीय वर्तुळात अनेकांना पडला आहे. या बैठकीनंतर अजित पवार गटाच्या मंत्र्यांना पालकमंत्रिपद मिळणार का? हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे. अमित शाह यांनी ‘सागर’ बंगल्यावरील बाप्पाचं दर्शन घेतलं. त्यानंतर अमित शाह, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली. या बंद दाराआड काही महत्त्वाच्या विषयावर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार हे गैरहजर होते. अजित पवार सध्या त्यांच्या नियोजित बारामती दौऱ्यावर आहेत. त्यामुळे ते मुंबईत अमित शाह यांच्या दौऱ्यादरम्यान बैठकीत हजर राहू शकले नाहीत, अशी माहिती मिळत आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तार गेल्या वर्षभरापासून रखडला आहे. मंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर शिंदे-फडणवीस अनेकदा दिल्लीला चर्चेसाठी जावून आले आहेत. आता चर्चा अंतिम टप्प्यावर आल्याची माहिती आहे. त्यामुळे अमित शाह यांच्यासोबतच्या आजच्या बैठकीत मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अंतिम निर्णय घेतला जातो का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. दरम्यान, अमित शाह आज फक्त काही तासांसाठी मुंबईच्या दौऱ्यावर आले आहेत. ते फडणवीस यांच्या निवासस्थानावरील बैठक आटोपल्यानंतर मुंबई विद्यापीठातील कार्यक्रमात सहभागी होतील.



### नेमकी कशावर चर्चा?

**तिन्ही नेत्यांच्या बैठकीत राज्यातील सध्याच्या घडामोडींवर चर्चा झाल्याची शक्यता आहे. राज्यात सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा समाज, धनगर समाज आक्रमक झाला आहे. तर ओबीसी समाजही आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे राज्यातील सत्तासंघर्षांवर राज्यात सध्या अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. सुप्रीम कोर्टाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना आमदार अपात्र प्रकरणी एका आठवड्यात सुनावणी घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे घडामोडी वेगाने घडत आहेत. नार्वेकर नुकतंच दिल्लीला जावून कायदेतज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन आले. यात भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधान आले आहे.**

### प्रसाद लाड यांचे वक्तव्य काय?

**राज्यात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात पुन्हा एकदा सरकार स्थापन होईल आणि देवेंद्र फडणवीस आमचे मुख्यमंत्री होतील. निश्चितपणे यात काही शंका नाही, बाप्पाने हे निश्चितच केल आहे, असा दावा भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी केला आहे.**

### बंद दाराआडच्या चर्चेत काय ठरलं?

**अमित शाह आणि शिंदे-फडणवीस यांच्यात ‘सागर’ बंगल्यावर १५ मिनिटे बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती समोर आलीय. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोमवारपासून शिवसेना आमदार अपात्रतेच्या प्रकरणावर सुनावणी सुरु होणार आहे. याबाबत या बैठकीत रणनीती ठरल्याची माहिती समोर आलीय. तसेच आगामी निवडणुकांच्या तयारीबाबत महत्त्वाची चर्चा पार पडली आहे. ‘सागर’ बंगल्यावर इतर भाजप आणि शिंदे गटातील नेते उपस्थित होते. मात्र अमित शहा, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे या तीनही नेत्यांनी बंद दाराआड चर्चा केली. त्यामुळे या चर्चेचे परिणाम लवकरच राजकारणात दिसतील, अशी माहीती सूत्रांनी दिलीय. दरम्यान, सागर बंगल्यावरील बैठक आटोपल्यानंतर हे तीनही प्रमुख नेते सह्याद्री अतिथीगृहावर आले.**

# नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापारी भूमिकेवर ठाम



### कालही लिलाव बंदच

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्र सरकारकडून महाराष्ट्रातील कांद्यावर निर्यात शुल्क लावण्यात आले आहे, दुसरीकडे कर्नाटक आणि व आंध्र प्रदेशातील कांद्यावर मात्र ४० टक्के निर्यात शुल्क नाही, असा दुजाभाव का? असा सवाल उपस्थित करत कांदा व्यापारी हे कदापि सहन करणार नाही. येत्या २६ सप्टेंबर रोजची पणन मंत्र्यांच्या बैठकीत काय निर्णय होतो, याकडे लक्ष असून तोपर्यंत कांदा व्यापाऱ्यांचा संप सुरूच राहील, अशी भूमिका नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापारी संघटनेने घेतली आहे.

कांदा व्यापारी असोसिएशनकडून बुधवारपासून बंदची हाक देण्यात आली असून पालकमंत्र्यांच्या बैठकींनंतरही तोडगा निघालेला नाही. अशातच काल या सर्व घडामोडींवर व्यापारी संघटनांनी बैठक घेत चर्चा केली. मात्र दोन-अडीच तास चाललेल्या या बैठकीतूनही निर्णय झाला नाही. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील कांद्याबाबत उदासीन असून निर्यातशुल्क वाढवून व्यापाऱ्यांवर अन्याय केला जात आहे, तो कदापि सहन करणार नाही, अशी भूमिका व्यापाऱ्यांनी घेत जोपर्यंत राज्य सरकार ठोस निर्णय घेत नाही, तोपर्यंत कांदा लिलावात सहभागी होणार नाही, बंद असाच सुरु राहील असा एकमुखी निर्णय व्यापारी संघटनेच्या बैठकीत घेण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यात कांदा प्रश्न चांगलाच पेटला असून शेतकऱ्यांच्या आंदोलनानंतर व्यापारी संघटनांनी पुकारलेल्या बंदमुळे कोट्यवधींची उलाढाल ठप्प झाली आहे. अशात पालकमंत्र्यांच्या बैठकीत तोडगा निघू शकला नाही. बुधवारपासून जिल्ह्यातील १७ बाजार समित्यांतील कांदा लिलाव बंद असून कांदा निर्यात शुल्क जोपर्यंत मागे घेतले जात नाही, तोपर्यंत लिलाव न करण्याची एकमुखी भूमिका व्यापाऱ्यांनी घेतली आहे. पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्यासमवेत गुरुवारी झालेल्या बैठकीत कोणताही तोडगा न निघाला नाही. त्यानंतर येवल्यात व्यापारी असोसिएशनने बैठक घेत चर्चा केली. पालकमंत्र्यांसह सर्वांच्या या बैठकीकडे लागल्या होत्या. मात्र सायंकाळी चार वाजेपासून पावणे सात वाजेपर्यंत बैठक चालली, यातून व्यापारी आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे दिसते आहे. येत्या २६ तारखेला मंत्रिमंडळ बैठकीत मागण्या मान्य झाल्या तर कांदा व्यापारी लिलावात सहभागी होतील, अन्यथा बेमुदत संपात सहभागी होणार असल्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

# धामणगाव अंगणवाडीत भ्रष्टाचार

### दोषींवर कारवाई करा : प्रशांत पाटील

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील धामणगाव येथील अंगणवाडीत साहित्य खरेदीत हजारोंचा भ्रष्टाचार उघड झाला आहे. याबाबत जि. प. च्या सीईओंनी संबंधीतांकडून रक्कम वसुलीचे आदेश दिले आहेत. परंतू संशयीतांवर अद्याप कारवाई होत नसल्याने त्यांना अभय तर दिले जात नाही ना, असा प्रश्न तक्रारदार प्रशांत अजबराव पाटील यांनी उपस्थित केला आहे.

अंगणवाडीच्या माध्यमातून लहान मुलांचा व्यक्तिमत्व विकास होत त्यांना शाळेची गोडीलागावी, यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. त्यात पोषण आहारासह लहान मुलांना खेळणी व इतर साहित्यासाठी शासन निधी देत असते. मात्र काही लहान मुलांच्या खेळण्यासाठी आलेला निधीच गायब करत असल्याचे प्रशांत पाटील यांच्या तक्रारीवरून समोर आले आहे.

३१ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रशांत पाटील यांनी धामणगाव (ता. धुळे) अंगणवाडी येथे लहान मुलांसाठी शासनाने दिलेल्या निधीचा गैरवापर झाल्याबाबत तत्कालीन गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार करत चौकशी करून गुन्हा दखल करण्याबाबत मागणी केली होती. याबाबत पाटीलयांनी पाठपुरावा सुरू ठेवत प्रशासनाला निः पक्षपाती चौकशी करण्यासाठी तगादा लावला. अंतरिम चौकशीअंती लहान मुलांच्या खेळणीसाठी शासनाने मंजूर केलेल्या ७२ हजाररुपयांच्या निधी



पैकी फक्त २४ हजार रुपये खर्च दाखवत ४७ हजार ७०० रुपये यात गहाळ झाल्याचे निदर्शनास आले. यामुळे लहान मुलांच्या खेळणी प्रक्रियेत भ्रष्टाचार करणार्यांवर कायद्याने कारवाई करावी, यासाठी प्रशांत पाटील यांनी तगादा सुरूच ठेवला. जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी याविषयी चौकशी अहवाल मागवत भ्रष्टाचार झाला असल्याचे उघड केल्याचे प्रशांत पाटील यांनी सांगितले. यापूर्वी देखील तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्राद्वारे यापूर्वी उघडकीस आलेल्या भ्रष्टाचार संदर्भात फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याबाबत लेखी आदेश दिलेआहेत. मात्र शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्याचे धाडस कोण करत आहे? याबाबत आता विविध चर्चांना उधाण आले आहे. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून जि.प.चे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मोठ्या अपेक्षेने लक्ष लागून असल्याचे सांगत आतातरी याबाबत संशयितांवर गुन्हादाखल करावा, अशा मागणीचे लेखी निवेदन देखील तक्रारदार पाटील यांनी दिले आहे.

# दोन संशयितांकडून सहा दुचाकी हस्तगत

**पंचवटी । प्रतिनिधी**

दोन संशयितांकडून सहा दुचाकी व एका संशयित युवकाकडून गावठी कट्टा जप्त करण्यास आडगाव गुन्हे शोध पथकास यश मिळाले आहे .याप्रकरणी आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, नाशिक शहरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटना बघता पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी गुन्हे उकल करण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण पंचवटी विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त नितीन जाधव यांनी केलेल्या सूचनांनुसार आडगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्याहदे यांच्या मार्गदर्शनाखाली आडगाव गुन्हे शोध पथक दुचाकी चोराचा माग काढत होते. त्यावेळी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मालेगाव येथील दोन संशयित हे शहर परिसरातील दुचाकी चोरी करतात. त्यानुसार मालेगाव गाठत संशयित मोबिन मोहम्मद शाबान शकील अहमद अन्सारी (२५) रा.मालेगाव व संशयित जुबेर रेहमान अतिकुर रेहमान पठाण (२०) रा. मालेगाव यांना ताब्यात घेतले.

या संशयितांची कसून चौकशी केली असता त्यांनी दुचाकी चोरीची कबुली दिली. यानंतर पोलिसांना आडगाव पोलिस ठाणे हद्दीतील स्वामी समर्थनगर परिसरात दोन युवक गावठी कट्टा घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून संशयित दर्शन उर्फ डोन्या भारत कीर्तने (२२) (रा. नांदूरनाका, आडगाव शिवार) व पियूष अशोक येवले (१९) (रा. राजगड बंगला, अयोध्या नगरी, अमृतधाम) यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडून पंचवीस हजार रुपये किमतीचा एक गावठी कट्टा जप्त करण्यात आला.

# आरक्षणाचा प्रश्न सोडवून एस.टी.चे प्रमाणपत्र द्या; धुळ्यात निदर्शने



**धुळे । प्रतिनिधी**

धनगर समाजाला आरक्षण मिळू नये याकरीता काही राजकीय मंडळींनी धनगर ऐवजी धनगड शब्दप्रयोग केला. परिणामी, आजवर महाराष्ट्रातील धनगर समाज आरक्षणापासून वंचित राहिला आहे. हा प्रश्न सोडवून धनगर समाजाला एस.टी. आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी आदर्श मल्हार बहुजन सेना ऑल इंडियातर्फे जिल्हा प्रशासनामार्फत पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचेकडे दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.


निवेदनात म्हटले आहे की, गेल्या ७६ वर्षांपासून धनगर समाजावर महाराष्ट्र राज्यात सातत्याने अन्याय होत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धनगर समाजाला एसटीमध्ये आरक्षण दिले आहे. मात्र काही राजकीय नेत्यांनी धनगर याचा धनगड असा विपर्यास केला आहे. परिणामी, धनगर समाज आरक्षणापासून वंचित आहे. काही राज्यात दुरूस्ती करून धनगर समाजाला एस.टी. चे प्रमाणपत्र देखील दिले आहे. महाराष्ट्रात मात्र धनगर समाजाला केवळ आश्वासने दिली जात आहेत. यासंदर्भात दि.२३ नोव्हेंबर २०२२ रोजी पाच जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन बैठकही घेण्यात आली. तरी देखील आज धनगर समाज बांधव शासकीय योजनांपासून वंचित आहेत. शासनाने खोटे आश्वासन देवून धनगर समाजाची फसवणूक केली आहे. त्यामुळे आरक्षणाचा प्रलंबित प्रश्न सोडवून एस.टी.चे प्रमाणपत्र देण्यात यावे अन्यथा धनगर समाज तीव्र आंदोलन छेडेल असा, इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनावर अध्यक्ष अभिलाल देवरे यांचेसह तालुका अध्यक्ष दिवान पाटील, तालुका कार्य संघटक समाधान मोरे, तालुका सरचिटणीस श्री.बोरसे, सरचिटणीस संजय राजपूत, बापू पाटील, शेतकरी संघटक योगेश पाटील यांची नावे व स्वाक्षर्या आहेत.

# रोहित पवारांसह सगळेजण मंत्रीमंडळात जायला तयार होते : मंत्री भुजबळांचा दावा

**नाशिक । प्रतिनिधी**

’अजित पवार गटातला एकही माणूस असा नाही, जो ब्लॅकमेल करेल. काहीही आपलं बोलायचं, उलट रोहित पवार आणि सगळ्यांनी मंत्रीमंडळात जायचं, असा निर्णय घेत या पत्रावर सह्या केल्या असल्याचा दावा मंत्री छगन भुजबळ यांनी केला. विरोधी पक्षात असल्यावर हे बोलायला पाहिजे, नाहीतर विरोधी पक्षाचे आमदार म्हणून कसं सिद्ध होईल? यासाठी हा खटाटोप असल्याचे वक्तव्य देखील छगन भुजबळ यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी पक्षातील संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. अजित पवार यांच्यासह इतर आमदार सत्तेत सहभागी झाल्यानंतर राष्ट्रवादीत उभी फूट पडली. शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट निर्माण झाले. त्यानंतर अनेक घडामोडी समोर आल्या. मात्र गेल्या काही दिवसात रोहित पवार आणि अजित गटातील नेत्यांचा संघर्ष टोकाला गेल्याचे पाहायला मिळत आहे. शरद पवार गटाचे एक आमदार आणि खासदार अजित पवार गटात जाण्याबाबत रोहित पवारांनी गंभीर आरोप केले. काही नेत्यांचा ब्लॅकमेलिंग सुरू आहे तू सही कर नाहीतर काम होणार नाही, असं कदाचित सांगितलं जात असा आरोप रोहित पवार यांनी केला. यावर भुजबळ यांनी रोहित पवार यांचा समाचार घेत मंत्रिमंडळात जाण्यासाठी रोहित पवार यांच्यासह सगळ्यांच्या सह्या पत्रावर करण्यात आल्या होत्या, असा गौप्यस्फोट भुजबळांनी केला आहे. तसेच विजय वड्डेट्टीवर यांच्या टीकेला उत्तर देताना भुजबळ म्हणाले की, विरोधी पक्षाकडून टीका सुरु आहे, ते त्यांचं काम करत आहेत. ते सगळे बोलणारच, विरोधी पक्षात असल्यावर ते काय करू शकतात? असं भुजबळ म्हणाले. तर राष्ट्रवादी पक्षाचं सुनावणीवर भुजबळ म्हणाले की, पवार साहेब म्हणाले होते, कायदेशीर लढाई लढणार नाही. पण नोटीसा द्यायचे काम झाले आहे. बघू काय होते ते? असा प्रश्न भुजबळांनी उपस्थित केला. नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या संपाबाबत छगन भुजबळ म्हणाले की, कांदा व्यपाऱ्यांचे काही प्रश्न भारत सरकारशी निगडित असून काही प्रश्न राज्य सरकारशी निगडित आहेत. वाणिज्य मंत्री पियूष गोयल ही मंडळी लोकसभा अधिवेशनात गुंतलेली आहे. सद्यस्थितीत कांदा प्रश्न हा अडचणीचा भाग झाला असून मुख्यमंत्री यांच्या कानावर घातलं आहे. लवकरच काहीतरी मार्ग निघेल, असा विश्वास भुजबळांनी व्यक्त केला.



### तर आमदार सुनील शेळके म्हणाले

**उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या आधी आमदार रोहित पवारांनी भाजपमध्ये जाण्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. आता आम्ही सत्तेत गेल्यावर ते अजित पवारांची जागा घेऊ पाहतायेत, असा गौप्यस्फोट अजित पवारांचे कट्टर आणि मावळचे आमदार सुनील शेळकेंनी केला. अजित दादांचं स्थान कुणीतरी घेऊ पाहिलं तर ते होणं शक्य नाही. रोहित पवार यांनी स्वतःची ओळख निर्माण करावी, स्वतःचं कर्तृत्व सिद्ध करावे. रोहित पवार स्वतःचे विचार मांडतात. रोहित पवारांना वेळी स्पेस मिळावी, रोहित पवारांना स्वतःचा कुठेतरी स्थान निर्माण व्हावं त्याकरता त्यांचा खटाटोप सुरू असल्याचे मावळचे आमदार सुनील शेळके यांनी वक्तव्य केले आहे.**

# जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील कुंडात पडली गाय

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या एका खोल कुंडात एक गाय काल रात्रीच्या अंधारात पडली. येथील वॉचमन श्री.आखाडे यांच्या नजरेत ही गाय काल सकाळी पडली. या गायीस दुपारी एक वाजेच्या सुमारास मनपाच्या अग्नीशमन दलाच्या कर्मचार्यांनी मोठ्या परिश्रमानंतर बाहेर काढले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या एका पाण्याच्या कुंड्यात काल रात्रीच्या सुमारास एक तपकीरी रंगाची गाय पडली. आज सकाळी ती येथील वॉचमन श्री.आखाडे यांच्या नजरेस पडल्याने घटनेस वाचा फुटली. वॉचमन श्री.आखाडे यांनी तात्काळ ही बाब त्यांच्या वरिष्ठांना सांगितली. वरिष्ठांनी मनपा अग्नीशमन दलाच्या कर्मचार्यांना मदतीसाठी बोलविले. अग्नीशमन दलातील प्रशांत मुर्तडक, वाहन चालक सचिन करनकाळ, योगेंद्र जाधव हे सहकार्यासह घटनास्थळावर दाखल झाले. त्यांनी पाण्याच्या कुंडात पडलेल्या गायीस बाहेर काढले. यावेळी गायीस बाहेर काढण्यासाठी जेसीबीची मदत घेण्यात आली. घटनेची माहिती कळताच या ठिकाणी नगरसेवक अमोल मासुळे यांनी धाव घेत मदतकार्य करणार्या कर्मचाऱ्यांना यथोचित मार्गदर्शन केले.

## खलिस्तानवाद्यांना आश्रय कशासाठी?

दि.१८ जून २०२३ रोजी कॅनडामधील ब्रिटिश कोलंबिया भागातील वाहनतळावर खलिस्तान टायगर फोर्सचा प्रमुख हरदीप सिंह निज्जर वाहन चालकाच्या आसनावर मोटारीत बसला होता. अचानक दोन युवक तेथे आले व त्यांनी त्याच्यावर गोळीबार करून ते पसार झाले. ही घटना साधी नाही. ज्याची हत्या झाली, तो खलिस्तानी आणि दहशतवादी होता. भारत सरकारला अनेक गंभीर गुन्ह्यामध्ये तो पाहिजे होता. भारताने तर हरदीपसिंह निज्जरला फरारी म्हणून घोषित केले होते. त्याला शोधून देणाऱ्यास दहा लाखांचे इनाम पोलिसांनी जाहीर केले होते. एक दहशतवादी ठार मारला गेला तर कॅनडाच्या पंतप्रधानांनी आदळआपट करण्याची व तीसुद्धा एवढ्या उशिरा करण्याची गरज काय भासली? घटनेनंतर तीन महिन्यांनी म्हणजेच १८ सप्टेंबर २०२३ रोजी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये म्हणजेच कॅनडाच्या संसदेत या घटनेसंबंधी एक निवेदन केले. जून महिन्यात ब्रिटिश कोलंबिया भागात निज्जरच्या झालेल्या हत्येमध्ये भारत सरकारच्या एजंटचा हात असू शकतो, असा त्यांनी गंभीर आरोप केला. जस्टिन ट्रुडो यांचा रोख भारताची गुप्तहेर संघटना 'रॉ'कडे होता. अर्थातच भारताने कॅनडाच्या पंतप्रधानांनी केलेले आरोप तत्काळ फेटाळून लावले. कॅनडाने केलेले आरोप बिनबुडाचे आहेत, असा सडेतोड जवाब भारताने कॅनडाला सुनावला. ज्याची कॅनडात हत्या झाली, तो निज्जर मुळातच खलिस्तानवादी, म्हणजे भारताचा देशद्रोही. तो खतरनाक दहशतवादी होता. अनेक गुन्ह्यांमध्ये तो भारताला पाहिजे होता. मग अशा निज्जरला कॅनडाचे नागरिकत्व मिळालेच कसे? भारताने कॅनडाला २६ खतरनाक दहशतवादी व खलिस्तानवाद्यांची यादी दिलेली आहे, त्यांना भारताच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी भारताने कॅनडाकडे यापूर्वीच केली आहे, मग ते दहशतवादी कॅनडात मोकाट फिरतात कसे? निज्जरच्या हत्येमागे विदेशी हात आहे, असा मोघम आरोप कॅनडाने सुरुवातीला केला होता. नंतर मात्र भारतीय एजन्सीचा हात आहे, असा थेट आरोप केला आहे. हे भारताच्या दृष्टीने जास्त गंभीर आहे. भारताने कॅनडाने केलेल्या आरोपानंतर खंबीर भूमिका घेतलीच पण कॅनडापुढे मान तुकविण्यास नकार दिला हे जास्त महत्त्वाचे आहे. भारतावर आरोप करण्यापूर्वी पुरावे द्यावेत, असे भारताने कॅनडाला स्पष्ट शब्दांत खडसावले आहे. पण या घटकेपर्यंत कॅनडाने भारताला पुरावे दिलेले नाहीत. पंतप्रधान जस्टिन ट्रुडो आणि कॅनडाच्या विदेशमंत्री मेलिना जौली यांनी भारताला पुरावे देण्यास नकार दिला आहे. याचा दुसरा अर्थ भारताची बदनामी व्हावी म्हणून भारतावर यापुढेही कॅनडातून हवेतच बाण सोडले जाणार आहेत का? कॅनडाच्या भूमिकेला अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया यांनी पाठिंबा दिला असला तरी कॅनडातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे नेते पिएरे पोलिवियरे यांनी पंतप्रधान ट्रुडो यांनी पुरावे सादर करावेत, आम्हालाही त्याची माहिती असणे जरुरीचे आहे, असे म्हटले आहे. कॅनडाच्या भूमीवर झालेल्या हिंसाचाराबद्दल थेट भारताला जबाबदार धरणे अतिशय गंभीर असल्याचे भारतानेच म्हटले आहे. खरे तर गेल्या काही वर्षांपासून कॅनडामध्ये दहशतवाद्यांची संख्या वाढत आहे. त्यांच्या कारवायांतून भारताच्या सार्वभौमत्वाला व अखंडत्वाला धोका निर्माण होतो आहे. अशावेळी कॅनडाने दुसऱ्याला दोष देण्याऐवजी आपल्या घरात काय चालले आहे, यावर बारीक लक्ष ठेवावे. कॅनडातील निज्जार हत्येचा तपास व्हावा व त्यासंदर्भात भारताला कोणतीही सूट दिली जाणार नाही, असे अमेरिकेने म्हटले आहे. भारताने कोणतीही सूट मागितलेलीच नाही. उलट निज्जार हत्येप्रकरणी आजवर तपासात जे पुरावे मिळाले आहेत ते आम्हाला द्यावेत, अशी भारताने मागणी केली आहे. झालेल्या हत्येबाबत तपास झालाच पाहिजे, तपास होऊ नये असे कोणी म्हणू शकणार नाही. तपासात भारताने सहकार्य करावे असे कॅनडाचे पंतप्रधान सांगत आहेत. पण भारतावर आरोप करताना त्याचे पुरावे देण्यास नकार देत आहेत, असे दुटप्पी धोरण कशासाठी? अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा व न्यूझिलंड या देशांचा 'फाईव्ह आईज' नावाचा गट आहे. कोणत्या देशावर काही संकट आले किंवा काही प्रश्न उपस्थित झाले की, गटातील सर्व देश एकमेकांच्या मदतीला धावतात. तसेच निज्जार हत्येनंतर गटातील देशांनी तपास झाला पाहिजे, अशी भूमिका इतरांनी मांडली आहे.

# लोकसहभागातून शाळांचा विकास

जगातील प्रगत देशांमध्ये स्थानिक लोक स्वराज्य संस्था, माजी विद्यार्थी, शाळांच्या परिसरातील उद्योग- व्यवसाय, प्रथित यश नागरिक, पालक ,विविध स्वयंसेवी संस्था यांचा त्या परिसरात कार्यरत असलेल्या शाळांच्या विकासात महत्वपूर्ण योगदान असते.

भारतात स्वातंत्र्यानंतर मातृभाषेतील शिक्षण प्रामुख्याने देण्याचे धोरण ठरले व संपूर्ण भारतभर केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या, जिल्हा परिषदेच्या, नगरपालिकेच्या शाळांचा विस्तार होत, ✻सर्वांसाठी शिक्षण✻ असे धोरण राबवले गेले. परंतु १९९० नंतर संपूर्ण भारतात जागतिकीकरणाचे वारे व्हायला लागले. अनेक परदेशी कंपन्या भारतात कारभार उभारायला लागल्या. तसेच भारतीय तरुणांना जगभर नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. या काळात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रमाण महाराष्ट्रासह सर्व देशभर वाढले . इंग्रजी माध्यमाचा शिक्षण विस्तार (जरी त्याला सरकारी अनुदान न देण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण असले तरी) महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणावर झाला. मराठी माध्यमाच्या शाळांच्या प्रवेशावर याचा फारच मोठा परिणाम झाला. सुरुवातीला पायाभूत सुविधांमध्ये मराठी व इंग्रजी माध्यमात फारसा फरक नव्हता परंतु आता तो फार मोठा फरक पडला आहे.

**१) इमारत व इतर सोयी सवलती-**

मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषद, राज्य शासन, नगरपालिका तसेच विविध शैक्षणिक संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या शाळांच्या काही इमारती या फारच जुन्या काळात बांधकाम झाल्यामुळे, बऱ्याचशा शाळांची अतिशय दुरावस्था झाली आहे. काही वर्ग गळतात. काही ठिकाणी पुरेशा इमारती नाही. बऱ्याच ठिकाणी शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी शौचालय उपलब्ध नाही. यासाठी आवश्यकतेनुसार प्रत्येक शाळेला उत्तम वर्ग खोल्या तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी शौचालय असणे गरजेचे आहे. मुलींसाठी शौचालय असणे तर अतिआवश्यक आहे. इमारती सोबतच काळानुरूप उत्तम असे डिजिटल शिक्षण देऊ शकणारे ,पायाभूत सोयी सवलती असणे आवश्यक आहे .शाळेसाठी उत्तम प्रयोगशाळा , वाचनालय खेळांसाठी सर्व प्रकारच्या सुविधा, कौशल्य विकासाच्या शिक्षणासाठी कार्यशाळा आवश्यक आहेत.

मागील ५० वर्षात सर्व शाळांमधून शिकून अनेक विद्यार्थ्यांनी आयुष्याच्या अनेक क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केली आहे .या सर्व विद्यार्थ्यांना आपल्या शाळेविषयी खूप आस्था असते. सर्व शाळांनी आपल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे दर तीन महिन्यांनी मेळावे भरवले पाहिजेत. या मेळाव्यात शाळेच्या गरजा त्यांच्यापुढे मांडल्या पाहिजेत. विद्यार्थी आपल्या शाळेविषयीच्या आस्थेतून तसेच आपण कार्यरत असलेल्या कंपनीच्या सीएसआर फंडातून, वैयक्तिक फंडातून शाळेसाठी आवश्यक इमारती, पायाभूत सुविधा सहज उपलब्ध करून देऊ शकतात. परंतु यासाठी शाळा व माजी विद्यार्थी यांच्यात उत्तम संवाद आवश्यक आहे.

शाळा कार्यरत असलेल्या तालुक्यात, जिल्ह्यात अनेक उत्तम उद्योगधंदे कार्यरत असतात. या सर्वांना त्या परिसराचा विकास घडवून आणण्यात फारच इंटरेस्ट असतो. त्यांच्यापर्यंत पोहोचून



,त्यांना शाळांच्या गरजांविषयी अवगत केले तर त्यातून नक्कीच शाळा उभारणीला गती येऊ शकते.

संपूर्ण महाराष्ट्रातून आपल्या लोकसंख्येच्या दहा टक्के म्हणजे जवळजवळ एक कोटी लोक परदेशात नोकरी निमित्त स्थायिक झालेले आहेत .त्याच्या मदतीने सुद्धा शाळा खोली बांधकाम ,शौचालय, वाचनालय ,प्रयोगशाळा यांचा विकास करून घेऊ शकतात.

भारतात जवळजवळ सर्व क्षेत्रात विविध स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. या सर्व स्वयंसेवी संस्थांना शाळेच्या विकासात सहभाग करून घेतले तरी शाळेच्या सर्व विकासाचे ध्येय यातून साध्य होऊ शकते.

**२) एकल महिला पालक, परीत्यक्ता महिला पालक तसेच आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी मदत-**

बऱ्याच पालक गमावलेल्या किंवा परित्यक्त महिलांच्या तसेच आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या समाजातील सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात आर्थिक अडचणीमुळे बरेच प्रश्न निर्माण होतात. माजी विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, उद्योग व्यवसाय यांच्यामार्फत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दृष्ट्या दत्तक योजना राबवली तर त्यातून या विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ लागू शकते. विद्यार्थ्यांची शाळेतली गळती थांबू शकते. ✻संपूर्ण भारतात तीन कोटीहून अधिक मुलांनी विविध कारणांनी शाळा सोडली आहे. यावरून या संपूर्ण समस्येची गंभीरता आपल्याला लक्षात येईल. कोणत्याही कारणाने एकही विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रात शाळा सोडणार नाही .यासाठी सरकार व संपूर्ण समाज यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

**३) शालेय विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे प्रत्येक शालेय विद्यार्थ्याने जीवन आवश्यक असे एक तरी कौशल्य आत्मसात केले पाहिजे असे म्हटले आहे. जगभर प्रगत देशात १३ ते १६ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांना एक तरी जीवनावश्यक कौशल्य आत्मसात करण्याकरता प्रयत्न केले जातात. त्यामुळेच जगभरातील प्रगत देशातील विद्यार्थी सोळाव्या वर्षी लहान-मोठे काम करून अर्थाजनाला सुरुवात करू शकतात. ✻भारतातील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार जीवनाच्या विविध क्षेत्रात कौशल्याचे काम करणाऱ्या लोकांकडून शालेय विद्यार्थ्यांना कौशल्याचे शिक्षण देणे आवश्यक केले आहे.✻ यासाठी पुन्हा माजी विद्यार्थी ,स्वयंसेवी संस्था, त्या परिसरात कार्यरत असलेले उद्योग व्यवसाय यांच्या मदतीने संपूर्ण शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेला कौशल्य विकास शिक्षणाचा कार्यक्रम आखता येईल. ✻याकरिता फार मोठ्या आर्थिक नियोजनाची गरज नाही. त्या सर्व गोष्टी फक्त इच्छाशक्ती व शाळा तसेच समाजातील सर्व घटक यांच्यातील संवादाने शक्य आहेत.

**४) नव तंत्रज्ञान व नव शोधासाठी लोकसहभाग-**

संपूर्ण जगभर प्रगत देशात शालेय विद्यार्थ्यांच्या नवनिर्मिती व नव शोधासाठी, विकासासाठी विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात व विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीची ध्यास रुजवला जातो. त्यातून जगभरातील व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पॉलिटेक्निक) तसेच विद्यापीठात रोजगाराची निर्मितीची संधी उपलब्ध होते. असे प्रयोग लोकसहभागातून भारतातील संपूर्ण शाळांमध्ये राबवता येणे सहज शक्य आहे आणि ही काळाची गरज आहे. जगभर औद्योगिक संस्था आपल्या विकासासाठी शैक्षणिक संस्थांच्या प्रयोग शाळांसाठी फार मोठा निधी उपलब्ध करून देतात व त्यातून नव संशोधनाची, नवतंत्रज्ञानाची उपलब्धता होते.

**५) शिक्षकांच्या शैक्षणिक व तांत्रिक विकासासाठी लोकसहभाग-**

आता तंत्रज्ञान बदलाचा वेग खूप वाढला आहे. दर पाच वर्षांनी संपूर्ण तंत्रज्ञान बदलत आहे . ✻बदलाचा वेध घेण्यासाठी शिक्षकांसाठी सतत प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. ही गरज स्थानिक उद्योगधंदे तसेच व्यवसायांच्या मदतीने पुरी केली जाऊ शकते. यासाठी उद्योगधंदे व शैक्षणिक संस्था यांनी आपल्या मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. सरकारी शाळा , सरकारी अनुदानित शाळा व खाजगी इंग्रजी शाळा यांच्या पायाभूत सुविधांमध्ये प्रचंड मोठी दरी निर्माण झालेली आहे व दिवसेंदिवस ती वाढत आहे. यासाठी व्यापक प्रमाणावर ध्येयधोरणात बदल आवश्यक आहेत तसेच या शाळांच्या विकासासाठी लोकसहभागाची आवश्यकता आहे. भारतात अनेक माध्यमाच्या शाळातून शिक्षण दिले जात असले तरी जगभर मातृभाषेतून दिलेले शिक्षण अधिक परिणामकारक असते असे सिद्ध झालेले आहे. मातृभाषेतून शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा कल वाढण्यासाठी त्या सर्व शाळांच्या पायाभूत सुविधा इंग्रजी माध्यमाच्या शाळा इतक्याच उत्तम असल्या पाहिजेत. याचा अर्थ सर्वच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उत्तम उपलब्ध आहेत असे मुळीच नाही. ✻बऱ्याचशा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पायाभूत सुविधा नाहीत तसेच उत्तम ट्रेनिंग घेतलेले शिक्षक उपलब्ध नाही ही वास्तव आहे. त्यामुळेच शाळा कोणतीही असो, सर्व शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी, सर्व विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळण्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे हे मात्र खरे!

# शाकाहार आणि अध्यात्म

- संत राजिन्दर सिंह जी महाराज

आजकाल अनेक डॉक्टर लोकांना निरोगी राहण्यासाठी शाकाहाराचा अवलंब करण्याचा सल्ला देत आहेत, त्यांचे म्हणणे आहे की केवळ शाकाहारामुळेच आपल्या शरीराला पुरेसे पोषण मिळते आणि मांसाहारामुळे होणारे आजार टाळता येतात. तथापि, शाकाहारी आहाराचे इतर पैलू देखील तितकेच महत्त्वाचे आहेत. संत-महात्म्ये आपल्याला समजावून सांगतात की शारीरिक आरोग्या व्यतिरिक्त, आपले अन्न आणि आपली अध्यात्मिक प्रगती यांचा जवळचा संबंध आहे.

आपल्या अंतरात प्रवेश करा

अध्यात्म हे केवळ आपल्या अंतरात जोडले जाणे नसून तर ते या सृष्टीतील सर्व जीवांवर प्रेम करणे आणि त्यांची काळजी घेणे देखील आहे. अध्यात्मामध्ये आपल्या खऱ्या स्वरूपाची म्हणजेच आपला आत्मा जो परमात्म्याचा एक अंश आहे याची जाणीव करणे समाविष्ट आहे. जसे की हे ब्रह्मांड, पृथ्वी आणि सर्व सजीव परमात्म्याने निर्माण केले असल्याने सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे आणि कोणाचेही नुकसान न करणे ही स्वाभाविकपणे आपली जबाबदारी आहे.

जे लोक खरोखरच परमात्म्याशी जोडलेले असतात, भले ते लहान असोत की मोठे, ते संपूर्ण सृष्टीप्रती प्रेमाने वागततात, सर्व मानव आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये ते परमात्म्याच्या ज्योतिला अनुभवतात.

जेव्हा आपण जीवनाकडे अध्यात्मिकदृष्ट्या पाहतो तेव्हा आपण सर्वांप्रती नम्र बनतो तेव्हा लहान प्राण्यांमध्येही परमात्मा विद्यमान असल्याचे अनुभतो. या दृष्टीकोनामुळे आपल्या अंतरात सर्वांप्रती प्रेम विकसित होते आणि मग आपण सर्व प्राणिमात्रांचा आदर करू लागतो. म्हणूनच जे लोक आपल्या आत्म्याशी जोडलेले आहेत ते शाकाहार आहार स्वीकारतात. त्यांना असे वाटते की परमात्म्याने आपल्याला जगण्यासाठी पुरेशी फळे, भाज्या आणि धान्य दिले आहे आणि अन्नासाठी कोणत्याही जीवाला मारण्याची गरज नाही.



आपण आपल्या स्वतःच्या कर्मासाठी जबाबदार आहोत.

जाणीव असलेल्या लोकांनी नेहमीच शिकवले आहे की प्राण्यांमध्येही चैतन्य किंवा आत्मा असतो जो आपल्याप्रमाणेच परमात्म्याचा अंश आहे, म्हणून शाकाहारी भोजनाचे अध्यात्मिक महत्त्व आहे की आपण कोणत्याही जीवाला दुखवू नये किंवा प्राण घेऊ नये. जर आपल्याला परमात्म्याची प्राप्ती करायची असेल, तर आपल्याला परमात्म्याच्या निर्मितीवर प्रेम करणे आणि त्याची काळजी घेणे आवश्यक आहे, म्हणूनच शाकाहारी भोजन हा अध्यात्मिक जीवनाचा एक भाग आहे.

शाकाहारामुळे ध्यान-अभ्यासात प्रगती होण्यास मदत होते

ज्या लोकांना ध्यान-अभ्यासात उन्नती करायाची आहे आणि आत्मिक विकास करायचा आहे त्यांच्यासाठी शाकाहार फायदेशीर ठरू शकतो. ज्या लोकांना अध्यात्मिक प्रगती करायची आहे आणि आपल्या आत्म्याचा अनुभव घ्यायचा आहे ते ध्यान-अभ्यासाचा सराव करून असे करू शकतात जो केवळ शाकाहारी अन्न खाण्यानेच प्राप्त होऊ शकतो. ध्यान-अभ्यासाच्या सरावासाठी स्थिरता आवश्यक असते. बरेचदा आपले लक्ष बाह्य दृश्ये, ध्वनी, वास, स्वाद आणि जगाच्या आकर्षणांकडे वेधले जाते, जे आंतरिक अध्यात्मिक दैवी दानापासून पासून दूर ठेवते जेव्हा आपल्याला अंतरात जाण्यासाठी एकाग्रता आवश्यकता असते.

ध्यान-अभ्यास साधना करताना आपण शांत, संयमी आणि एकाग्र असणे आवश्यक आहे. मृत जीवाचे अन्न वर्ज्य करून काय फायदा होईल? एक फायदा असा आहे की असे अन्न त्यागल्याने आपली एकाग्रता वाढते. आपल्या शरीरावर हार्मोन्सचा काय परिणाम होतो. याची आपल्याला कल्पना आहे, जरा विचार करा आपल्या शरीरात तणावाशी संबंधित किती हार्मोन्सचा निर्माण होतात, जे त्या पशुपक्षी किंवा माशांमध्ये असतात. जेव्हा त्यांना कत्तल खान्यात ठेवतात किंवा त्यांची कत्तल करतात आणि आपण जेव्हा त्यांचे सेवन करतो तेव्हा तो आपल्या शरीराचा एक भाग बनतो. आपण जे अन्न खातो त्याचा केवळ आपल्या शरीरावर, भावनांवर आणि बौद्धिक रचनेवर परिणाम होत नाही तर आपल्या अध्यात्मिक चेतनेवरही परिणाम होतो. शाकाहारी अन्न हे निसर्ग नियमांशी सुसंगत आहे.

शाकाहारी अन्न खाल्ल्याने निसर्गातील किमान घटकांचा नाश होतो कारण त्यात जीवनाचा नाश होण्याचे कमीत कमी प्रमाण आहेत. ज्या लोकांना ध्यान-अभ्यासात वेगाने प्रगती करायची आहे त्यांच्यासाठी शाकाहारी अन्न खाणे महत्त्वाचे आहे. जगातील अनेक महान तत्ववेत्ते, कवी, कलाकार, लेखक आणि जागरूक लोक देखील शाकाहारी होते. जसे की आयझॅक न्यूटन, महात्मा गांधी आणि अल्बर्ट श्वेत्झर ही काही महान तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, परोपकारी आणि नेत्यांची उदाहरणे आहेत ज्यांनी अहिंसेचा मार्ग अवलंबून आणि शाकाहारी आहाराचे अनुसरण करून इतरांना प्रेरित केले.


जर आपण सहानुभूतीपूर्ण अहिंसेचे जीवन जगण्याचा प्रयत्न करत असाल किंवा अंतरीचा खजिना मिळविण्यासाठी मन शांत करण्याचा प्रयत्न करत असाल, तर साहजिकच आपल्याला आपले ध्येय गाठण्यास मदत होईल. स्वाभाविकपणे असे अन्न शरीराला खाद्य म्हणून देऊ. जेव्हा महान रोमन कवी सेनेका याला पायथागोरसची शिकवण समजली तेव्हा तो शाकाहारी झाला. त्याने आनंददायी बदल अनुभवला आणि आश्चर्य वाटेल की त्याचे मस्तिष्क अधिक सजग आणि सतर्क झाले आहे.

महान भौतिकशास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाईन यांनी म्हटले आहे की, मनुष्यास निरोगी जीवन जगण्यासाठी कोणतीही वस्तु तितका लाभ देऊ शकत नाही, जितकी शाकाहारी भोजन देईल.

ज्या लोकांना संपूर्ण विश्वासाठी प्रेम आणि अहिंसेने परिपूर्ण जीवन जगायचे आहे आणि अध्यात्मिक प्रगती करायची आहे, त्यांना शाकाहारी भोजन मदत उपयुक्त ठरू शकते. आपण परमात्म्याच्या निर्मितीमध्ये केवळ आपल्यापेक्षा लहान प्राणी आणि तर संपूर्ण मानवजातीसाठी दया आणि करुणेने भरलेले जीवन जगले पाहिजे, इतकेच नव्हे तर आपण स्वतःवर सुद्धा दया केली पाहिजे.

चला तर! मग आपण आपल्या जीवनात शाकाहारी आहाराचा अवलंब करून विश्वातील सर्व प्राणिमात्रांप्रती आपले प्रेम व्यक्त करूया आणि त्याच बरोबर आपल्या आध्यात्मिक प्रगतीकडे वाटचाल करूया.

## शब्दकोडे-१८७



**आडवे शब्द**

१. खर्चात कपात ६. पुष्कट ९. पोटापुरता शिधा ११. प्रमाणपत्र १२. विश्रांती १४. गणगोत १६. तात्काळ १८. आपला देश १९. मोठी चूल २०. चोरी करणारा २२. झाडलोट २४. वाढलेला व्याप २५. जरतारीचा मोर यावर नाचतो २७. प्रयत्न २८. घाव, प्रहार २९. रोखलेली नजर ३१. संतोष, आनंद ३४. समुद्रकिनारा ३८. पुरुष ३९. शिव! शिव! ४०. नुसतीच भटकंती ४१. विशेष ४२. अत्यंत यातनामय अवस्था ४५. माळ, सर ४६. हात ४८. पर्जन्य ४९. फोडातील द्रव ५०. गप्पांची जागा ५२. वक्र ५३. पूर्ण भेदून जाणारे ५४. शरीर ५५. अरण्य, जंगल ५६. तीव्र, अत्यंत टोकदार ५७. दिवस ५९. अर्धांगवायू ६१. चर्चा ६३. कावळा ६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण ६५. टोळीचा प्रमुख ६७. खिडकी ६९. मच्छर ७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार ७३. हनुमान (ग्रा.) ७५. प्रेम, ममता ७७. हमाल ८१. सूर्याचे एक नाव ८२. ठोक, हाण! ८३. युक्ती ८४. नेता, पुढारी

**उभे शब्द**

१. कपडालत्ता २. टिंगल, टवाळी ३. केव्हा (ग्रा.) ४. शाश्वत, चिरंतन ५. सोन्या-चांदीचा व्यापारी ७. महाशिवरात्रीचा मराठी महिना ८. परस्पर ९. पुन्हा पुन्हा १०. प्रगती, उन्नत १२. विमान १३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र १५. निवासस्थान १७. आत-बाहेर करण्याची चौकट २१. दात २३. वंशपरंपरागत अधिकार २६. फळातील द्रव २७. सामान्य ३०. तापापूर्वीचे शहारे ३२. माणूसकी ३३. धैर्य, हिंमतीचे काम ३५. मगज ३६. कडक, न दबणारे ३७. साहित्यातील नऊ भावना ४१. मीठाची चव ४२. नाकी दम आणणारा आकडा ४३. भरपूर रस असलेला ४४. वेडावाकडा ४५. परिस्थिती ४६. पळसाचा डिंक ४७. जन्म-मृत्यू ४८. मोदकाचे आच्छादान ५०. पत्र ५१. अभिप्राय ५३. नाविकदल ५५. मध्यरात्रीचा पाऊस ५८. विरोध, द्वेष ६०. आठवाड्याचा दिवस ६२. चिकटून, जवळ ६६. अति तीव्र, जाळणारे ६८. माफी, दया ७०. दाताखालचा, मदतनीस ७२. महान ७४. कैकयीची दासी ७६. वेदना ७७. वजन ७८. सुंदर तरुणी, पत्नी ७९. शंकर ८०. शेवट

## शब्दकोडे १८६ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.अवकाळी ३.मानधन ७.खटला ९.अवस १०.रिकामटेकडा १३.रजतम १५.सुमन १६.फोल १७.वाणी १८.रावण १९.माड २०.वार्ता २१.तलठी २३.हातोहात २४.जहर २५.पालट २६.जामात २८.अंतर २९.लवा ३०.पागा ३१.चरस ३३.पाक ३५.गो ३६.करवत ३८.फलाट ४०.लवाजमा ४१अ.चळत ४३.खीर ४४.तहहयात ४७.वल्गना ४८.टक ५०.थवा ५१.वनसरणी ५४.लहानसहान ५६.चराचर ५८.विमा ५९.भान ६१.रजनी ६२.आकलन ६३.अडीनडीला ६५.रावस ६६.वमन ६८.तमासगीर ६९.कणीदार ७०.कमलाकर ७२.टर ७३.टणत्कार ७४.तोल ७५.वीट

**उभे उत्तर**

१.अनारसा २.काबूत ३.मावळण ४.नस ५.नरिमन हाऊस ६.फाटे फोडणे ७.खडा ८.लावणी ११.कान १२.कल १४.मराठी १७.वार्ताहर २०.वाजतगाजत २१.तलवार २२.लाट २३.हातचलाखी २५.पालक २६.जागा २७.कृपा ३०.पाताळ ३२.रटरट ३४.कलह ३७.वचनावचनी ३९.खंत ४१.वाया ४२.तडस ४५.हनन ४६.पावा ४७.वनचर ४९.कलमा ५२.नर ५३.रसकस ५५.हातोडी ५७.राजकुमार ५८.विनवणी ६०.नरवर ६२.आवरण ६३.अनार ६४.लावालावी ६५.रागीट ६७.मदार ६८.तट ६९.कर ७०.कल ७१.कट

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### युवतीचा विहिरीत पडून मृत्यू

**नाशिक ।** नाशिक - विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेलेल्या २३ वर्षाच्या युवतीचा बुडून मृत्यू झाला. याबाबत कळवण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. कळवण तालुक्यातील जांभुळपाडा शिवारात राहणारी चित्रा ठाकरे ही स्वयंपाकाला लागणारे पाणी भरण्यासाठी विहिरीवर गेली होती. विहिरीच्या कठड्याजवळ उभी असताना पाय घसरुन तोल गेल्याने ती विहिरीत पडली. तिचा बुडून मृत्यू झाला.

### भावसार समाज विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**धुळे ।** येथील भावसार समाज मंडळातर्फे रविवार दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता भावसार भवन येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महापौर सौ. प्रतिभाताई चौधरी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख पाहुणे जिल्हा पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, सा.बां. विभागाचे अधीक्षक अभियंता विवेक नवले, धुळे मनपा उपायुक्त डॉ. संगिता नांदुरकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे.

# थ्रेडिंग पाईप्स, सीमलेस ट्यूब निर्मितीचा कारखाना सिन्नरमध्ये

## निर्यातक्षम उद्योगामुळे परकीय चलन मिळणार

**नाशिक । प्रतिनिधी**

समुद्रातील तेल, गॅस आणि अन्य त्याच्या उत्पादनात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी जिंदल हंटिंग एनर्जी सर्विसेस (जेएचइएसएल) या कंपनीने लोखंडी पाईप्स आणि अतिशय शास्त्रशुध्द तसेच मानवाच्या स्पर्शा व्यतिरिक्त आधुनिक यांत्रिकीकरणाने पाईप्सना थ्रेडिंग करण्याचे व सिमलेस ट्यूबचे उत्पादन सिन्नरच्या जिंदल कंपनीमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सुमारे २१० कोटी (२५ मिलियन डॉलर) खर्चातून उभ्या राहिलेल्या या स्वतंत्र युनिटमध्ये दरवर्षी थ्रेडिंग क्षमता सुमारे ७० हजार टन पाईपची निर्मिती होणार आहे. अशा प्रकारचे पाईप्स व ट्यूबचे उत्पादन करणारी ही देशातील एकमेव कंपनी असल्याची माहिती जिंदल सॉ लिमिटेडचे अध्यक्ष पी.आर. जिंदल यांनी एका पत्रकार परिषदेत दिली. सिन्नर जवळील माळेगाव एमआयडीसीमधील जिंदल कंपनीच्या परिसरात जिंदल हंटिंग एनर्जी सर्विसेस लिमिटेड या स्वतंत्र युनिटचे उद्घाटन सोमवारी जिंदल सॉल लिमिटेडचे अध्यक्ष पी.आर.




### या प्रकल्पाची वैशिष्ट्ये

**या प्रकल्पाची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे डिसेंबर २०२३ पासून ऑइल आणि गॅस काढण्यासाठी उपयोगी ठरणाऱ्या पाईपची येथे निर्मिती होणार आहे. तसेच वर्षाला ७० हजार टन थ्रेडिंग पाईपची निर्मिती होईल. त्याचबरोबर कमीत-कमी मनुष्यबळाचा वापर करून रोबोटिकच्या वापरामुळे कामात अचूकता प्राप्त होईल. देशासह विदेशातील ऑइल आणि गॅस कंपन्यांकडून पाईपची बुकिंग पुढील दोन वर्षासाठी कंपनीकडे आगाऊ झालेली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्याचबरोबर कंपनीतून शून्य टक्के वेस्टेज बाहेर पडेल पाणी शुद्ध करून त्याचा पुनर्वापर होणार असल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.**

जिंदल, हंटिंग पीएलसीचे सीईओ जिम जॉन्सन, व्यवस्थापकीय संचालक डॅनियल टॅन, निरज कुमार यांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान यावेळी जिंदल म्हणाले की, या सुविधेची कल्पना 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून करण्यात आली आहे. तेल आणि वायू उद्योगाच्या ओसीटीजी (ऑईल कंट्री टुबिलर गुड्स) क्षेत्रातील उत्पादने आणि सेवांची विस्तृत श्रेणी ऑफर करते. या माध्यमातून देशातील पाईपची उणीव भरून निघेल आणि विदेशातही त्याची निर्यात होऊ शकेल असे जिम जॉन्सन यावेळी म्हणाले. ते पुढे म्हणाले की, 'मेक इन इंडिया' या उपक्रमाच्या समर्थनार्थ जिंदल एसएडब्ल्यू आणि हंटिंग या दोघांनी एक इतिहास रचला आहे. हे उत्पादन स्थानिक ऑइल आणि गॅस उद्योगांसाठी फायद्याचे ठरणार आहे. त्याचबरोबर भारताच्या ऊर्जा संक्रमणामध्ये देखील महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. तर डॅनियल टॅन म्हणाले की, सिमलेस पाईप मिलच्या शेजारी बांधलेले जेव्ही मॅन्युफॅक्चरिंग हब आणि मुंबई बंदरात सुलभ प्रवेशासह आम्ही केवळ भारतातील झपाट्याने वाढणाऱ्या देशांतर्गत बाजारपेठेला जागतिक दर्जाचे प्रीमियम ओसिटीजी प्रदान करतो. मध्य, पूर्व आणि आफ्रिकेच्या बाजारपेठेतील एक महत्त्वाचे प्रवेशद्वार म्हणून सेवा देखील देत आहोत. जेव्ही मॅन्युफॅक्चरिंग हब खरोखरच प्रीमियम ओसीटीजी आणि घरगुती अंतरराष्ट्रीय दोन्ही मौल्यवान ग्राहकांसाठी एक स्टॉप असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिंदल कंपनीतील उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.



# लासलगाव महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**लासलगाव । वार्ताहर**

येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा विभागाच्या वतीने आयोजित स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी याविषयी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेसाठी मारुती कंधारे,सौरभ तिपायले,अमोल पुंड,वीरेंद्र आहेर,लखन माने,ज्ञानेश्वर चव्हाण,वाल्मीक आरोटे,सृष्टी थोरात,किशोर अंकुळणेकर हे व्याख्याते म्हणून लाभले.या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे,उपप्राचार्य प्रा.भूषण हिरे,उपप्राचार्य व स्पर्धा परीक्षा विभाग समन्वयक डॉ.सोमनाथ आरोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप आणि या परीक्षांची तयारी कशी करायची याबाबत मारुती कंधारे आणि किशोर अंकुळणेकर यांनी सविस्तर माहिती दिली. सौरभ तिपायले आणि वाल्मीक आरोटे यांनी संघ लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप आणि त्यासाठी करायच्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली. वीरेंद्र आहेर आणि सृष्टी थोरात यांनी आय.बी.पी.एस. आणि बँकिंग परीक्षेचे स्वरूप व या परीक्षांची तयारी कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. अमोल पुंड यांनी स्टाफ सिलेक्शन कमिशन (एसएससी) अंतर्गत ज्या वेगवेगळ्या परीक्षा घेतल्या जातात त्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. लखन माने आणि ज्ञानेश्वर चव्हाण यांनी सरळ सेवा भरती अंतर्गत वर्ग २ व वर्ग ३ ची पदे कशी भरली जातात तसेच या परीक्षेचे स्वरूप कसे असते याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी यांनी प्रयत्न केले. प्रा सुनिल गायकर यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. या कार्यशाळेसाठी डॉ.नारायण जाधव, प्रा.मिलिंद साळुंके यांच्यासह इतर सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महास्वयंम वेबपोर्टलवर तक्रार नोंदविण्याठी हेल्पलाईन सुरू

**नाशिक । प्रतिनिधी**

कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महास्वयंम पोर्टलवर ऑनलाईन सुविधा घेतांना लाभार्थी घटकांना येणाऱ्या अडचणी/तक्रारींचे निराकरण करण्यासाठी १८ सप्टेंबर २०२३ पासून हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. हेल्पलाईनचा टोल फ्रि क्रमांक १८००१२०८०४० हा आहे. असे सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग नाशिक अनिसा तडवी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

विविध लाभार्थी घटक जसे उमेदवार, उद्योजक, नियोक्ते यांना नोंदणी करणे, नोंदणीचे अद्ययावतीकरण करणे, रिक्त पदे अधिसूचित करणे, रिक्त पदास अनुसरून प्लाय करणे, राज्यातील युवक व विद्यार्थी यांना करियर विषयक संधीची माहिती, रोजगार मेळावे व रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम यामध्ये इच्छुकता दर्शविणे, विविध प्रशिक्षण संस्था, स्टार्टअप इत्यादी विविध ऑनलाइन सेवा-सुविधा महास्वयंम पोर्टलवरून देण्यात येतात. सुरू करण्यात आलेल्या हेल्पलाईनची वेळ सकाळी ८.०० ते रात्री ८.०० अशी आहे. हेल्पलाईन टोल फ्रि क्रमांक १८००१२०८०४० वर उमेदवार, उद्योजक/ नियोक्ते, सर्व लाभार्थी घटकांनी आपल्या अडचणी व तक्रारीची नोंद करावी असे आवाहन सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग नाशिक अनिसा तडवी यांनी केले आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून एक लाख रुपयांना गंडा

**नाशिक ।** लग्नाचे आमिष दाखवत संशयित टोळीने एकाची एक लाख तीन हजार रुपयांना फसवणूक केली. या प्रकरणी सुरगाणा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चांदवड येथील एका युवकास सुनील चौधरी, कृष्णा गावित, जगन चौधरी यासह अन्य काही लोकांनी विश्वासात घेत लग्नासाठी मुलगी दाखवतो, असे आमिष दाखविले. यासाठी आभासी पध्दतीने त्याच्याकडून ३२,५०० रुपये आणि ७०,५०० रुपये असे एकूण एक लाख तीन हजार रुपये घेतले. मुलीचे नातेवाईक असल्याचे भासवत मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम झाला. मुलीच्या हातात काही पैसे देण्यात आले. यावेळी दोन लाख रुपये देण्याचे ठरले. त्यानंतर वेळोवेळी पैसे घेऊन संबंधित युवकाची फसवणूक करण्यात आली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी सुरगाणा पोलीस ठाण्यात तक्रार केल्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# प्र. द. कुलकर्णी यांना दीपस्तंभ पुरस्कार प्रदान

**नाशिक । प्रतिनिधी**

ऋषि पंचमीनिमित्त प्राचार्य प्र. द. कुलकर्णी यांना नाशिकच्या शुयमा संस्थेतर्फे दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

सिध्दहस्त लेखक, नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांच्या हस्ते प्रभाकर दत्तात्रय कुलकर्णी, पत्नी डॉ.आशा या उभयतांचा सन्मान करण्यात आला. पुणेरी पगड़ी, शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मान पत्र असे दीपस्तंभ पुरस्काराचे स्वरूप होते. प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजिका शरयू देशमुख व श्री.पंच दिगंबर



आखाड्याचे -अनी आखाड्याचे प्रमुख महंत किशोर दास शास्त्री उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष सतीश शुक्ल, कार्यवाह भानुदास शौचे, कार्याध्यक्ष तुषार जोशी तसेच पं.वैभव दीक्षित, धनंजय पुजारी यांच्या अथक परिश्रमांनी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# जिल्ह्यातील महत्त्वाच्या दळणवळण व्यवस्थेबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी चर्चा

## केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार

**नाशिक । प्रतिनिधी**

चांदवड शहरातील प्रस्तावित उड्डाण पुलास ५० मी चे ५ स्पॅन देण्याबाबत तसेच श्री रेणुका देवी मंदिराजवळ सेवा रस्ता (सर्व्हिस रोड) बनविणे, राहूड घाटात व भावडबारी घाटात नियमित होणारे अपघात टाळण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना व सुधारणा करणे याबाबत केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून चर्चा करण्यात आली. अशी माहिती केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिली आहे. यावेळी चांदवड-देवळा मतदार संघाचे आमदार डॉ. राहूल आहेर उपस्थित होते.

दिंडोरी लोकसभा मतदार संघातील देवळा तालुक्यातील महत्वाचा असलेला एनएच ७५२ जी सटाणा-देवळा-मंगरूळ रस्त्यावरील



शेतकऱ्यांच्या भू संपादित होणाऱ्या जमिनीच्या अडचणीं संदर्भात व साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धे शक्तीपीठ असलेल्या श्री क्षेत्र सप्तशृंगी देवी गडावर जाणारा नाशिक दिंडोरी वणी रस्त्यास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळावा व रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

दिंडोरी, पेठ, सुरगाणा या तालुक्यातील वाहनधारक व स्थानिक जनतेला चाचडगाव टोलनाक्यावरून सवलत मिळावी यासाठी राष्ट्रीय राज्यमार्ग ८४८ हा दिंडोरी, पेठ, सुरगाणा या तालुक्यातून गुजरातला जाणाऱ्या रस्त्यावरील कोटंबी व सावळघाटासह अनेक कामे प्रलंबित असल्याने अपघाताचे प्रमाण वाढू नये. तसेच टोल परिसरातील २० किलो मीटरच्या स्थानिक वाहनधारकांना सवलतीच्या दरात मासिक पास देण्यामागची व नियमित शेतमाल ने- आण करणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांना टोलमध्ये सवलत देण्याची आग्रही मागणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे केली असून त्यासाठी केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांनी देखील याबाबत सकारात्मक विचार करू, असे यावेळी सांगितले.

प्रस्तावित असलेला सुरत- चेन्नई ग्रीन फिल्ड रस्तासाठी जमिन भुसंपादन व शेतकऱ्यांना त्याबाबतचा योग्य मोबदला मिळण्याबाबत देखील केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे सविस्तर चर्चा करून निवेदन दिल्याचे राज्यमंत्री डॉ.पवार यांनी सांगितले.

# गरुड झेपचे सामाजिक कार्य स्फूर्तीदायी – मंत्री गडकरी

**नाशिक ।** जागतिक स्तरावर वाहतूक अपघात हा कळीचा मुद्दा बनला आहे. सर्वात जास्त मृत्यू हे रस्ता अपघातात होत आहेत. अशावेळी डॉ. संदीप भानोसे आणि त्यांच्या सर्व गरुडझेप प्रतिष्ठानची टीम वाहतूक सुरक्षा अभियान राबवत खूप मोठे कार्य करत आहे. याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे असे प्रतिपादन केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

गरुड झेप प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेले २००० हून दिवस वाहतूक सुरक्षा व पर्यावरण रक्षा अभियान सातत्यपूर्णरित्या राबविले जात आहे. त्याचा समाजामध्ये सकारात्मक परिणाम देखील दिसत आहे. २५ मार्च २०१८ रोजी सदर अभियान सुरू करण्यात आले. १५ सप्टेंबर २०२३ रोजी सातत्यपूर्ण दोन हजार दिवस पूर्ण झाले आहेत. याची जागतिक विक्रमात देखील नोंद झाली आहे.

# मविप्रच्या कर्मवीर अॅड.ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी लेफ्टनंटपदी

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कर्मवीर अॅड. बाबुराव गणपतराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी विभागातील विद्यार्थी ऋषिकेश सावंत, रितीक भडांगे

तसेच स्थापत्य विभागाचा विद्यार्थी हर्षवर्धन पगार या तीनही विद्यार्थ्यांची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या कंबाईंड डिफेन्स सर्व्हीसेस यांची 'लेफ्टनंटपदी' निवड झाली आहे.

यात यांत्रिकी विभागाचा ऋषिकेश सावंत हा महाराष्ट्रातून पहिला तर संपूर्ण भारतात चौथा आला आहे. तसेच हर्षवर्धन पगार हा स्थापत्य विभागाचा विद्यार्थी







देशात सहावा आला. आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमात कायमच सातत्य राखत या सगळ्यांनी उत्तुंग असे हे यश प्राप्त केले आहे.

या सर्वांची राष्ट्रीय स्तरावरील 'ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी चेन्नई येथे पुढील प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

त्यांच्या या उत्तुंग यशासाठी 'अभियंता दिनी मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस अॅड. डॉ. नितीन ठाकरे यांनी वैयक्तिकरित्या या विद्यार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार केला. या

विद्यार्थ्यांनी मिळालेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनिल ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती डी.बी.मोगल, चिटणीस दिलीप दळवी तसेच नाशिक तालुका संचालक अॅड. लक्ष्मणराव लांडगे, रमेश पिंगळे तसेच मविप्र समाज संस्थेचे सर्व तालुका संचालक व शिक्षणाधिकारी डॉ. डी.डी.लोखंडे, प्राचार्य डॉ. एस.आर.देवणे, उपप्राचार्य डॉ. व्ही.एम बिरारी, रजिस्टार सृष्टी शिंदे, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

# एस. व्ही. के. एम. अभियांत्रिकीच्या संघाचे राष्ट्रीय हॅकॅथॉन हॅक-द-मेटाव्हर्स स्पर्धेत यश

**नाशिक । प्रतिनिधी**

धुळे येथील एस. व्ही के. एम. अभियांत्रिकी महाविद्यालयातील डी-व्हिजन या संघाने आय. ई. ई. ई. कॉम्प्युटर सोसायटी बंगलोर चॅप्टर प्रतिष्ठित इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बेंगळुरू येथे झालेल्या हॅक-द-मेटाव्हर्स ह्या हॅकॅथॉन स्पर्धेत बाजी मारली आहे.

या स्पर्धेत संघाचा भारतातील विविध शैक्षणिक संस्था जसे कि, आयआयटी, एनआयटी यांच्यासोबत थेट सामना झाला आणि त्यात संघाने बाजी मारत बक्षीस रकमेसह तृतीय क्रमांक मिळविला. महाविद्यालयासाठी ही सर्वात मोठी उपलब्धी असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश साळुंके यांनी दिली.

आय. ई. ई. ई. कॉम्प्युटर सोसायटी बंगलोर चॅप्टर प्रतिष्ठित द्वारे आयोजित या स्पर्धेत अनेक मंत्रालये, सरकारी आणि खाजगी संस्थांच्या समस्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांद्वारे त्यांच्या प्रकल्पांच्या माध्यमातून सोडवून घेण्यासाठी हि स्पर्धा आयोजित करण्यात येते. याच स्पर्धेत सॉफ्टवेअर या श्रेणीमध्ये डी-व्हिजन संघाने तिसरा डोळा या समस्या विधानावर प्रा. आशिष आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाव्य उपाय शोधून त्यावर प्रबंध सादर केला. डी-व्हिजन या संघात देवयानी जाधव, जयेश चौधरी, गौरव शिरुडे, वैष्णवी चौधरी सर्व तृतीय वर्ष आणि शेवटचे वर्ष संगणक विभागात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

महाविद्यालयातील विद्यार्थी दरवर्षी स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धा तसेच इतर राष्ट्रीय नाविन्यपूर्ण स्पर्धासारख्या तांत्रिक स्पर्धा जसे कि, टेक्नोकेव्ह, इको-कार्ट, ई-बाहा, एरोमॉडेलिंग, ई-बाईक यांमध्ये सहभाग घेतात. २०२३ मध्ये महाविद्यालयातील टेक-रक्षक या संघाने कवच-सायबर सुरक्षा राष्ट्रीय हॅकॅथॉन स्पर्धेत १ लाख रुपयांच्या बक्षीस रकमेसह देशात पहिला क्रमांक पटकावला. २०२२ मध्ये महाविद्यालयातील टेकनॉईड या संघाने स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेत १ लाख रुपयांच्या बक्षीस रकमेसह देशात पहिला क्रमांक पटकावला. तसेच २०२० मध्ये महाविद्यालयातील एस-फाल्कन या संघाने नॅशनल इलेक्ट्रिक कार्ट चॅम्पियनशीप या रेसिंग कार स्पर्धेत १ लाख रुपयांच्या बक्षीस रकमेसह देशात ५ वा क्रमांक पटकावला. तसेच २०१९ मध्ये एरोमॉडेलिंग स्पर्धेत एम-मोब्युलस या संघाने देशात १० वा क्रमांक पटकावला. संगणक विभाग प्रमुख डॉ. मकरंद शहाडे, हॅक-द-मेटाव्हर्स ह्या हॅकॅथॉन विभाग समन्वयक प्रा. आशिष आवटे, संगणक विभाग शैक्षणिक समन्वयक प्रा. भूषण नांदवलकर (ऊ-उ), -उच् समन्वयक प्रा.खालिद अल्फात्मी, कौशल्य विकास समन्वयक प्रा.किरण सोमवंशी, असि. रजिस्ट्रार अनमोल सूर्यवंशी, इतर मार्गदर्शक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रेरणा यामागे असल्याचेही डॉ. निलेश साळुंके यांनी सांगितले.

## न्यूज कॉलम

### दोंडाईचा रोटरी स्कूलमध्ये चांद्रयानाची प्रतिकृती

**दोंडाईचा ।** येथील श्रीमती मंदाकिनी टोणगावकर रोटरी इंग्लिश स्कूल व श्रीमती बसंतीबाई पाबुदानजी संचेती रोटरी प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल यांच्यातर्फे प्री-प्रायमरी स्कूल, रोटरी मार्ग येथे श्रीगणेशाची विधिवत प्रतिष्ठापना शाळे अध्यक्ष हिमांशू शहा व हेतल शहा यांच्या हस्ते झाली. प्राचार्य श्रुतिरंजन बारीक, इन्चार्ज बतुल बोहरी, अंजू वालेचा, अनेरी शहा, पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. गणेशोत्सवानिमित्त चांद्रयान-३ अवकाशयानाची प्रतिकृती, विक्रम लँडर व प्रज्ञान रोव्हरचा देखावा साकारण्यात आला आहे.

### देवरे महाविद्यालयात राजभाषेवर व्याख्यान

**म्हसदी ।** येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात हिंदी विभागातर्फे हिंदी दिवसानिमित्त दहिवेल (ता. साक्री) येथील उत्तमराव पाटील महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अशोक मराठे यांचे 'हिंदी राजभाषा का महत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले. प्राचार्य संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील उपस्थित होते. प्रा. जगदीश वाघ यांनी सूत्रसंचालन केले.

# प्रोजेक्ट दृष्टी व सर्व्हाईवलतर्फे मोफत नेत्र तपासणी

## आ.कुणाल पाटील यांची अंधमुक्त व्हीलेज संकल्पना ; कापडणेत ४७८ महिलांना मोफत चष्मे वाटप

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या संकल्पनेतून धुळे तालुक्यात अंधमुक्त व्हिलेज संकल्पना राबविली जात आहे. त्याअनुषंगाने प्रोजेक्ट दृष्टी व सर्व्हाईवल टेक्नॉलॉजी लिमिटेड आणि जवाहर मेडीकल फाउंडेशनचे एसीपीएम मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने कापडणे ता.धुळे येथे भव्य मोफत महिला नेत्ररोग निदान व मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रीया शिबीर आणि मोफत चष्मे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी एकूण ९२२ महिलांची नेत्र तपासणी करण्यात आली तर ४७८ महिलांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.



**४७८मोफत चष्मे वाटप**

**कापडणे ता.धुळे येथे आयोजित नेत्र तपासणी शिबीराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यात एकूण ९२२ महिलांची नेत्र तपासणी करण्यात आली तर ४७८ महिलांना मोफत चष्म्यांचे वाटप केले गेले, दरम्यान त्यापैकी एकूण ७८ महिलांच्या मोतिबिंदू शस्त्रक्रीयेसाठी जवाहर मेडीकल येथे बोलविण्यात आले आहे. या शस्त्रक्रीया मोफत करण्यात येणार असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले.**

**जर्मनीहून मागविले चष्मे**

**प्रोजेक्ट दृष्टी व सर्व्हाईवल टेक्नॉलॉजी लिमिटेड आणि जवाहर मेडीकल फाउंडेशनचे एसीपीएम मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या महिला नेत्र तपासणी शिबीरात एकूण ४७८ महिलांना मोफत चष्मे देण्यात आले. सदर चष्मे खास जर्मनीहून मागविण्यात आले होते. त्यामुळे चष्म्यांची उत्तम पध्दतीने बनावट असल्याने महिलांनी समाधान व्यक्त केले.**

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, डोळ्यांच्या आरोग्याबाबत ग्रामीण भागात माता-बघिनींचे दुर्लक्ष असते. अनेकवेळा दृष्टी दोष असूनही डोळ्यांची काळजी घेतली जात नाही. त्यामुळे त्यांच्या गावातच डोळ्यांची तपासणी व्हावी, आवश्यकतेनुसार शस्त्रक्रीया करण्यात यावी म्हणून आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली कापडणे येथे फक्त महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन केले होते. अंधमुक्त व्हीलेज ही संकल्पना आ.पाटील यांच्या नेतृत्वाखाली धुळे तालुक्यातील प्रत्येक गावात राबविली जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर दि.२७ सप्टेंबर रोजी कापडणे ता.धुळे येथे भव्य मोफत महिला नेत्ररोग निदान व मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रीया शिबीर आणि मोफत चष्मे वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या विशेष उपस्थितीत शिबीराचे उद्घाटन आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, ग्रामीण भागात जीवन जगत असतांना माता बघिनी डोळ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे नियमित डोळ्यांची तपासणी करुन गरजेनुसार चष्म्याचा वापर केल्यास काळजी घेतली जाते. धुळे तालुक्यातील प्रत्येक गावात नेत्र तपासणी शिबीर राबवून अंधमुक्त व्हीलेज करण्याचा आमचा संकल्प आहे त्यामुळे नेत्र तपासणी शिबीराचा लाभ प्रत्येकाने घेण्याचे आवाहन आ.पाटील यांनी यावेळी केले.

भव्य मोफत महिला नेत्ररोग निदान व मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रीया शिबीर आणि मोफत चष्मे वाटप कार्यक्रमाला माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील,आ.कुणाल पाटील,सौ.लताताई रोहिदास पाटील,सौ.अश्विनीताई कुणाल पाटील,बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील माजी सभापती गुलाबराव कोतेकर,उपसभापती योगेश पाटील,संचालक एन.डी.पाटील, काँग्रेस कार्याध्यक्ष अशोक सुडके, बाजार समितीचे संचालक विशाल सैंदाणे,रावसाहेब पाटील, ऋषीकेश ठाकरे, माजी संचालक माधवराव पाटील,बापू खैरनार,जि.प.सदस्य अरुण पाटील, माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील,महिला काँग्रेस अध्यक्षा गायत्री जयस्वाल, बाजार समितीचे संचालक कुणाल पाटील, कापडणे सरपंच सोनीताई भिल, पं.स.सदस्य राजेंद्र पाटील, डॉ.संदिप पाटील,देवभाने सरपंच संजय देसले, धनुर सरपंच चेतन पाटील, कापडणे माजी सरपंच प्रमोद पाटील, राजा पाटील, भटू पाटील, हरिष पाटील, प्रविण पाटील, डॉ.संदिप पाटील, न्याहळोद सरपंच प्रकाश वाघ, हिरामण चौधरी, शरद माळी, भटू गिरासे, रामराव पाटील, विजय चौधरी, ॲड.बी.डी.पाटील, हसण पठाण, नवल पाटील आदी उपस्थित होते. महिलांची नेत्र तपासण जवाहर मेडकील फाउंडेशनचे डॉ.सुरेंद्र वडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.योगेश तांबोळी,डॉ.केतकी भट,डॉ.गौरव पाटील,डॉ.केतकी देवतळे यांच्या वैद्यकीय पथकाने केली.

# आगामी सणउत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुव्यवस्था राखण्यासाठी यंत्रणेने नियोजन करावे

## जिल्हाधिकारी अभिनव गोयल

**धुळे । प्रतिनिधी**

आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह शांततामय वातावरणात सण उत्सव साजरे होण्यासाठी यंत्रणेने आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले आहेत.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात आढावा बैठक आज जिल्हा नियोजन सभागृह येथे संपन्न झाली. याबैठकीस जिल्हा पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, पोळा, गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद तसेच आगामी काळात विविध सण उत्सव साजरे करण्यात येणार आहे. या काळात कुठलीही अनुचित घटना घडून नये यासाठी यंत्रणने आवश्यक उपाययोजना कराव्यात. गणेशोत्सव काळात ज्या मार्गावरुन मिरवणूक तसेच ज्याठिकाणी विसर्जन करण्यात येणार त्या मार्गांची संबंधित यंत्रणेने पाहणी करुन उपाययोजना कराव्यात. गणपती मंडळ परवानगी कामी एक खिडकी योजना कार्यान्वित करावी. जिल्ह्यातील अतिसंवेदनशिल, संवेदनशिल आणि लोक वर्दळ असलेल्या ज्या भागातून मिरवणूक जाणार आहे. त्याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही या बाबत पोलीस विभागालने बंदोबस्त ठेवावा. शहरातील संवेदनशिल भागात असलेले ठिकाणी तसेच धार्मिक स्थळाची पाहणी करुन सीसीटीव्ही बसविण्यात यावेत. शांतता प्रस्तापित होण्यासाठी मोहल्ला बैठका व शांतता समितीच्या बैठका घ्याव्यात. सोशल मिडीयावरील आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. संवेदनशिल स्मारक,पुतळे तसेच शहरातील वादग्रस्त जागेचा आढावा घेवून पोलीस बंदोबस्त लावण्यात यावा. समाजकंटक, सराईत गुन्हेगारावर प्रतिबंधात्मक कारवाई करावी. अनाधिकृत पोस्टर, बॅनर, होर्डिग्जवर कारवाई करावी. रस्त्यावरील खड्ड्याची डागडूजी करावी, गणेश मिरवणुक तसेच विसर्जन दरम्यान अनावश्यक विद्युत तारा तसेच झाडांची फाद्यांची छाटणी करावी. सण उत्सवकाळात वीजपुरवठा सुरळीत राहील यासाठी विद्युत विभागाने काळजी घ्यावी. उत्सव काळात अवैध दारुविक्री, तसेच उत्सव काळात महापालिकेने मोकाट गुराचा बंदोबस्त करावा. विर्सजनाच्या ठिकाणी स्वच्छता, निर्माल्य विर्सजन, लाईटची व्यवस्था, बॅरिकेट्स, आदी बाबींचे नियोजन करावे, गणेश मुर्तीच्या विसर्जनासाठी कृत्रिम हौदाची निर्मिती करावी.

# चार हजारांची लाच घेतांना महिला अधिकाऱ्यास अटक

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यात दिवसेंदिवस लाचखोरीचे प्रमाण वाढल्याचे पाहायला मिळत असून अनेक बडे मासे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडत आहेत. काही महिन्यांपूर्वी नाशिक महापालिकेच्या लाचखोर शिक्षणाधिकारी सुनीता धनगर यांना ५० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले होते.

यानंतर दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत विजयी सदस्यांच्या हरकतीच्या बाजूने निकाल देण्यासाठी ३० लाख रुपयांची लाच घेतांना तात्कालीन जिल्हा उपनिबंधक सतीश खरे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले होते. त्यानंतर १५ लाख रुपयांची लाच घेतांना नाशिकचे तहसीलदार नरेशकुमार बहिरम यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते. लाचखोरीच्या या घटना ताज्या असतानाच आता पुन्हा एकदा दोन वर्षांपासून बंद असलेल्या कंपनीचा व्यवसायकर रद्द करून देण्याच्या मोबदल्यात चार हजार रुपयांची लाच स्वीकारतांना जीएसटी महिला अधिकाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, स्नेहल सुनिल ठाकुर (५२) (व्यवसाय कर अधिकारी कार्यालय, कृषी औद्यागिक संघ लि. द्वारका, नाशिक) रा. आश्विन हॉटेलजवळ, आश्विन संकुल रो हाऊस, आश्विन नगर, नाशिक) असे लाचखोर जीएसटी महिला अधिकाऱ्याचे नाव आहे. तक्रारदार यांनी त्यांचे कल्पदीप इंडस्ट्रियल सेक्यूरिटी सर्विसेस ही कंपनी दोन वर्षांपासून बंद असल्याने तिचा व्यवसायकर रद्द व्हावा यासाठी १३ सप्टेंबर रोजी व्यवसाय कर अधिकारी यांच्या कार्यालयात अर्ज केला होता. सदर व्यवसायकर रद्द करून द्यायच्या मोबदल्यात यातील लोकसेविका स्नेहल ठाकुर यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ५ हजारांची मागणी केली. तडजोडीअंती ४ हजार रुपये देण्याचे ठरले. यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दिली. त्यानंतर तक्रारीची शहानिशा केल्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने व्यवसाय कर कार्यालयात सापळा रचला. यावेळी तक्रारदाराकडून लाचेची ४ हजार रुपयांची रक्कम स्वीकारतांना दबा धरून असलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ठाकूर यांना रंगेहाथ अटक केली.

# गणेशोत्सवावर चांद्रयानाची छाप

**धुळे ।** जिल्ह्यात तीव्र दुष्काळाची छाया आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवरही गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा होत आहे. अनावश्यक खर्चाला कात्री लावण्याचा प्रयत्न गणेशमंडळांचे कार्यकर्ते करीत आहेत. ग्रामीण भागातील विविध देखाव्यांवरही परिणाम जाणवत आहे. टाकाऊपासून टिकाऊ देखावे सादर करण्याची धडपड कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. घरगुती गणेशमंडळांसह सार्वजनिक मंडळांवर चांद्रयान- ३ ची छाप पडलेली दिसून येत आहे. पढावद (ता. शिंदखेडा) येथील ग्रामविकास शिक्षण संस्था संचलित विवेकानंद हायस्कूलमध्ये श्रीगणेशाची प्रतिष्ठापना झाली. चांद्रयानाच्या प्रतिकृतीचा देखावा तयार करण्यात आला आहे. हा देखावा पाहण्यासाठी ग्रामस्थही गर्दी करीत आहेत. वर्षाराणी पाटील या उपशिक्षिकेच्या संकल्पनेतून देखावा साकारण्यात आला.

# कंत्राटी भरतीचा निर्णय मागे घ्या!

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसने जाळला शासनाचा आदेश

**धुळे । प्रतिनिधी**



राज्य शासनाने कंत्राटी पद्धतीवर अधिकारी, कर्मचारी घेण्याचे आदेश काढले आहे. याविरोधात आज राष्ट्रवादी युवक काँग्रेसने तीव्र निदर्शने करून शासनाने काढलेल्या आदेशाची होळी केली. सद्य:स्थितीतील कार्यरत कंत्राटी कर्मचार्यांना अगोदर नियमित करण्याची मागणी करण्यात आली. सदर आंदोलन जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले यांच्यानेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आले.

महाराष्ट्र सरकारने सहा सप्टेंबर रोजी काढलेल्या निर्णयात बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून कंत्राटी पद्धतीने अधिकारी, कर्मचारी घेण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये, प्रत्येक विभागामध्ये रिक्त असलेले पद कंत्राटी पद्धतीने बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्ती केले जातील. शिक्षक, इंजिनियर, ग्रामसेवक, लिपिक, वरिष्ठ सहाय्यक, डाटा एन्ट्री ऑपरेटर,तांत्रिक अधिकारी, शिपाई, ड्रायव्हर आदी पदे ही कंत्राटी पद्धतीने एजन्सी मार्फत भरले जातील. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने नऊ एजन्सीचे पॅनल बनवलेले आहे. त्या पॅनल मधील एका एजन्सीची निवड करून त्याद्वारे भरती करण्याचे आदेश दिलेले आहेत. शिंदे- फडणवीस-अजित पवार सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील युवकांवर बेरोजगारीची कुर्हाड पडणार आहे. या निर्णयामुळे सर्वत्र नाराजी असून फक्त ठराविक वर्गाचा फायदा करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप राष्ट्रवादीने केला आहे. म्हणून हा निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. उलट, अनेक वर्षांपासून कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचार्यांना करावे, वयाच्या ५८ वर्षापर्यंत नोकरीची हमी द्यावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. आजच्या आंदोलनात रणजीत भोसले, वाल्मिक मराठे, निखिल मोमया, जगन ताकटे, डी. टी. पाटील, रईस काझी, समद शेख, निखिल वाघ, मयूर शिंदे, विशाल पाटील, आकाश बैसाणे, भटू पाटील, राजू डोमाळे, अशोक धुळकर, संजय नेतकर, जितू पाटील, गोरख शर्मा, कल्पेश मगर, प्रशांत बोरसे, वैभव पाटील, असलम खाटीक, हाशिम खुरेशी, अब्दुल कादिर, भोला सैंदाणे आदी उपस्थित होते. कार्यरत कंत्राटी कर्मचार्यांना अगोदर नियमित करण्याची मागणी करण्यात आली. सदर आंदोलन जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले यांच्यानेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आले.

# दिंडोरीत अडीच लाखांचा भेसळयुक्त मावा जप्त

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथील विजयममता चित्रपटगृहाजवळील स्वीटमार्ट व्यवसायिक नाशिकमध्ये इतर स्वीटमार्ट दुकानदारांना भेसळयुक्त मावा पुरविण्यासाठी गुजरात येथून आणत असल्याची गुप्त माहिती नाशिक ग्रामीण पोलिसांना मिळताच त्यांनी दिंडोरी तालुक्यातील उमराळे बु. येथे सापळा रचून दोन लाख सत्तावीस हजार किमंतीचा भेसळयुक्त स्वीट मावा जप्त करत गणेशोत्सव काळात धडाडीची कामगिरी केली आहे.

नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक शहाजी उमाप व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शांताराम नाठे, दिपक अहिरे, विनोद टिळे, गिरीष बागूल, अनुपम जाधव यांनी काल रात्री दोन वाजेच्या सुमारास पेठ-नाशिक महामार्गावर गुजरात राज्यातून नाशिक शहरात मिठाई बनविण्यासाठी लागणारा भेसळयुक्त मावा पदार्थ दिंडोरी तालुक्यातील उमराळे बु. येथे पिकअप वाहन क्रमांक (एमएच १५ एचएच ००२१) या वाहनात सुमारे ५० गोण्या, प्रत्येकी ३० किलो वजन, एकूण दीड टन असा असून दोन लाख सत्तावीस हजार किमंतीचा भेसळयुक्त स्वीट मावा आढळून आला. यावेळी सदरचा संशयित भेसळयुक्त मावा हा नाशिक शहरातील स्वीटमार्ट व्यावसायिक तुळशीराम राजाराम चौधरी रा. विजयममता, नाशिकरोड हा नाशिक शहरातील विविध स्वीटमार्ट दुकानदारांना पुरवठा करीत असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झालेली असून पुढील कार्यवाहीसाठी अन्न व औषध प्रशासन विभाग नाशिक यांना दिंडोरी पोलीस ठाणे येथे बोलावून पुढील कारवाईसाठी ताब्यात देण्यात आले आहे.

# शिरपूर आमदार कार्यालयात आयुष्यमान कार्ड नोंदणी व कार्ड वाटप

**शिरपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, शिरपूर विधानसभा तर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा पंधरवडा अंतर्गत माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांचा मार्गदर्शनाखाली आयुष्यमान भव: सप्ताह अंतर्गत आयुष्यमान कार्ड नोंदणी व कार्ड वाटप करण्यात आले.

आमदार काशिराम पावरा, धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांच्या हस्ते दि. २२ सप्टेंबर २०२३ रोजी शिरपूर येथील आमदार कार्यालयात आयुष्यमान भव: सप्ताह



अंतर्गत आयुष्यमान कार्ड नोंदणी व कार्ड वाटप करण्यात आले. यावेळी धुळे भाजपा जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, तालुकाध्यक्ष किशोर माळी, शिरपूर कृउबा समिती सभापती के. डी. पाटील, माजी नगरसेवक अशोक कलाल, कृउबा समिती माजी संचालक ॲड. प्रताप पाटील, भाजपा शहर उपाध्यक्ष प्रशांत चौधरी, माजी सरपंच रमेश पाटील आदि उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टी, शिरपूर विधानसभा तर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू झालेल्या सेवा पंधरवडा अंतर्गत दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान विविध कार्यक्रम होत आहेत. त्या अनुसंगाने आयुष्यमान भव : सप्ताह अंतर्गत आयुष्यमान कार्ड नोंदणी व कार्ड वाटप करण्यात आले असून या दरम्यान सुमारे ६० हजार आयुष्यमान कार्ड वाटप करण्यात येणार असून आयुष्यमान कार्ड नोंदणी व कार्ड वाटप आमदार काशिराम पावरा, धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आ. काशिराम पावरा म्हणाले की, 'सबका साथ सबका विकास' हा मूलमंत्र घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जन कल्याणाच्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. देशातील गोरगरीबांच्या कल्याणासाठी योजना आहे असे सांगितले.

धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी म्हणाले की, आयुष्यमान कार्ड या शासकीय योजनांचा गरीब वर्गाला मोठा लाभ होणार असून देशाच्या अनेक परिवारांच्या जीवनात हातभार लागेल असा विश्वास या वेळी त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त सुरू झालेल्या सेवा पंधरवडा अंतर्गत सर्व घटकांना लाभ पोहोचवणाऱ्या या योजनांचे वाटप करण्यात येत असल्याचेही सांगितले. या कार्यक्रमाला लाभार्थी मोठ्या संख्येने या प्रसंगी उपस्थित होते. शिरपूर आमदार कार्यालयात माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून गेल्या अनेक वर्षांपासून विकास योजना आपल्या दारी अभियान व भूपेशभाई पटेल फ्रेंड सर्कल यांच्या वतीने शिरपूर तालुक्यातील हजारो लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ प्रत्यक्ष मिळवून देण्यासाठी दररोज नियमितपणे व्यापक स्वरूपात यंत्रणा काम करत आहे. आयुष्यमान भव: सप्ताह अंतर्गत आयुष्यमान कार्ड नोंदणी व कार्ड वाटप करण्यात आले.

# मुकेशभाई पटेल सैनिकी विद्यालयात श्री गणेशाची स्थापना

**शिरपूर । प्रतिनिधी**

तांडे ता. शिरपूर येथील मुकेशभाई पटेल मुला-मुलींची सैनिकी शाळा व कनिष्ठ विज्ञान महाविदयालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. गणरायाची स्थापना व पूजा शाळेचे प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या हस्ते करण्यात आली. गणरायाच्या आगमनात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. तसेच मोठ्या जल्लोषात गणरायाची स्थापना करण्यात आली.

श्री गणेशाचे डेकोरेशन साठी टाकाऊ पासून टिकाऊ



या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांनी विविध टाकाऊ वस्तूंचा वापर केला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. आरती झाल्यानंतर शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी गणरायाचे दर्शन घेऊन पूजन केले व प्रसाद ग्रहण केला.